मोटार अपघात दावा क्र.१७/२०२३
अर्चना वि. अरूण
नि.क्र.४०

**<u>गैरअर्जदारा क्र.३ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.एस.एन.गुरव यांच्या वतीने</u>**

१. मी मागील ५ वर्षापासून गावचा सरपंच आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपचुंदा हे गाव औसा पोलीस ठाण्याला जोडलेले आहे. माझे कामानिमित्त औसा पोलीसांसोबत ओळख आहे. माझ्याकडे औसा पोलीस ठाण्याचा दुरध्वनी क्रमांक नाही. माझ्याकडे त्यावेळच्या साहेबांचा दुरध्वनी क्रमांक होता. माझे शिक्षण १० वी पर्यंत झाले. माझा मोबाईल त्या दिवशी सोबत होता. हे म्हणणे खरे आहे की, औसा ते निलंगा हा पूर्व – पश्चिम रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, हा रस्ता साधारण ३० फुट रूंदीचा सिमेंट रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, या रस्त्याच्या दोन्ही बाजूला ३ ते ४ फुटाचा कच्चा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, विजय सोया मिल ही रस्त्याच्या उत्तर बाजूला आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपचूंदा गावाला येण्यासाठी या रस्तयाच्या उत्तर बाजूकडून म्हणजेच डाव्या बाजूने यावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, विजय सोया मिल मध्ये रस्त्याच्या बाजूला त्यांच्या क्षेत्रामध्ये पटागंण आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या दोन्ही बाजूला छोटे छोटे हॉटेल आहेत. हे मला माहित नाही की, रस्त्यावरील हॉटेल सकाळी लवकर उघडतात. हे म्हणणे खरे आहे की, विजय सोया मिलचे कार्यालय सकाळी ९.०० नंतर उघडते. हे म्हणणे खरे आहे की, सोयाबीनचे भाव दररोज बदलतात. हे म्हणणे खरे आहे की, प्रशासकीय कार्यालयातील कर्मचारी आल्याशिवाय सोयाबीनचा भाव जाहिर केला जात नाही. पोलीसांनी माझा एक वेळेस जबाब घेतला. माझा जबाब दि.२६/११/२०२२ रोजी घेतला. हे म्हणणे खरे नाही की, दि.२६/११/२०२२ पूर्वी मी पोलीसांना जबाब दिला नाही किंवा घटनेची माहिती दिली नाही. साक्षीदार स्वतः सांगतो घटनेची माहिती दिली. मी दिलेल्या माहितीचे कागदपत्र दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, नैसर्गिक कारणासांठी रस्त्याच्या बाजूला कच्चा रस्त्यावर गाडी थांबवावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी मी रस्त्याच्या दक्षिण बाजूला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी परत येत असताना एका अनोळखी वाहनाने माझ्या मित्राला धडक दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामध्ये सदर अल्टो वाहनाचा कोणताही सहभाग नाही. हे म्हणणे खरे आहे

**मोटार अपघात दावा क्र.१७/२०२३**

**अर्चना वि. अरूण**

**नि.क्र.४०**

की, हा अपघात रस्त्याच्या दक्षिणबाजूला झालेला आहे. मी अपघाताबाबत पोलीस ठाण्यात त्या दिवशी माहिती दिली नव्हती. मी अपघातानंतर हॉस्पीटलला गेल्यावर अपघाताबाबतची माहिती सिव्हील हॉस्पीटल किंवा सहयाद्री हॉस्पीटल येथे माहित दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वतः फिर्याद देण्यासाठी गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरपंच असल्याने व राजकीय दबावाचा वापर करून तसेच पोलीस व गाडी मालक यांच्याशी हात मिळवणी करून अपघाताची नुकसान भरपाई विमा कंपनीकडून मिळविण्यासाठी अपघातात अल्टो गाडीला सामावून घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हे माझ्या गावातील तसेच माझ्या मित्राचे कुटूंबिय असल्यामुळे त्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी मी खोटे शपथपत्र दाखल केले व खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, झालेला कथाकथित अपघात हा माझ्या मित्राच्या चुकीमुळे अनोळखी वाहनासोबत झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

Digitally signed by PADMAKAR PRABHAKAR KESTIKAR
Date: 2025.09.15 16:49:37 +0530

पी.पी.केस्तीकर

दि.१५/०९/२०२५

तदर्थ जिल्हा न्यायाधीश–२ व

पदसिध्द सदस्य,मो.अ.दा.प्रा.,

लातूर